भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# मसाले पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६

## (१९८६ चा अधिनियम क्रमांक १०)

[१९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान]

# The Spices Board Act, 1986

## (Act No. 10 of 1986)

[*As in force on the 19th March, 2004*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००७

[**किंमत :** रुपये १६.००]

**प्राक्कथन**

या आवृत्तीत, दिनांक १९ मार्च २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि स्पायसेस बोर्ड ॲक्ट, १९८६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर २००४ यात पृष्ठ १६५ ते १७५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ [केंद्रीय विधि] अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड [क] अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १४ ऑक्टोबर २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

# PREFACE

This edition of The Spices Board Act, 1986 as on the 19th March 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October 2004 on pages 165 to 175.

This authoritative text was published under the authority of the President under section, 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 14th October 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# मसाले पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६

## कलमांचा क्रम

कलमे


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.

प्रकरण दोन

**मसाले पदार्थ मंडळ**

३. मंडळ घटित करणे आणि कायद्याद्वारे संस्थापित करणे.
४. सचिव आणि इतर अधिकारी.
५. सल्लागार समित्या.
६. वेलची मंडळाची आणि मसाले पदार्थ निर्यात प्रचालन परिषदेची मत्ता व दायित्त्वे मंडळाकडे हस्तांतरित करणे.
७. मंडळाची कामे.

प्रकरण तीन

**वेलची संपदांच्या मालकांची नोंदणी**

८. वेलची संपदांच्या मालकांची नोंदणी.
९. राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.
१०. नोंदणीकृत मालकांनी विवरण तयार करणे.

प्रकरण चार

**मसाले पदार्थ निर्यात करण्यासाठी प्रमाणपत्र**

११. कोणतीही व्यक्ती प्रमाणपत्राशिवाय मसाले पदार्थ निर्यात करणार नाही.
१२. प्रमाणपत्र देणे.
१३. प्रमाणपत्र रद्द करणे किंवा निलंबन करणे, इत्यादी.
१४. अपील.
१५. प्रमाणपत्राखेरीज निर्यात करण्यास परवानगी देण्याचा अधिकार.

प्रकरण पाच

**केंद्र सरकारचे नियंत्रण**

१६. वेलचीच्या वितरणाचा आणि दर नियंत्रणाचा अधिकार.
१७. वेलचीच्या आयातीस मनाई करण्याचा किंवा नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.
१८. केंद्र सरकारचा निदेश देण्याचा अधिकार.
१९. केंद्र सरकारचा मंडळ निष्प्रभावित करण्याचा अधिकार.

प्रकरण सहा

**वित्तव्यवस्था, लेखे आणि लेखापरीक्षा**

२०. केंद्र सरकारकडून अनुदान व कर्जे.
२१. मंडळाचा निधी.
२२. अर्थसंकल्प.
२३. वार्षिक अहवाल.
२४. लेखे व लेखापरीक्षा.
२५. संसदेत वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकांचा अहवाल मांडणे.

## प्रकरण सात

### संकीर्ण


२६. चुकीची विवरणपत्रे तयार करण्याबाबत शास्ती.

२७. मंडळाचे अधिकारी किंवा सदस्य यांना आपली कर्तव्ये पार पाडताना अडथळा आणण्यासाठी किंवा पुस्तके आणि अहवाल दाखल करण्यास निष्फळ होण्यासाठी शास्ती.

२८. दर इत्यादीच्या नियंत्रणाशी संबंधित आदेशाचे उल्लंघन केल्यास शास्ती.

२९. कलम ११ किंवा कलम १७ खाली करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्यास शास्ती

३०. इतर शास्ती.

३१. कंपन्यांनी केलेले अपराध.

३२. १९६२ चा अधिनियम, ५२ च्या तरतुदी, मसाले पदार्थांची निर्यात व वेलचीची आयात करणे यास लागू होणे.

३३. केंद्र सरकारची पूर्वमंजुरी.

३४. प्रत्यायोजन.

३५. सदस्य, अधिकारी व मंडळाचे कर्मचारी हे लोकसेवक असणे.

३६. सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

३७. प्रवेश करण्याचा अधिकार.

३८. नियम करण्याचा अधिकार.

३९. विनियमन करण्याचा अधिकार.

४०. संसदेत नियम व विनियम ठेवणे.

४१. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

४२. निरसन व व्यावृत्ती.

अनुसूची.

# मसाले पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६

## (१९८६ चा अधिनियम क्रमांक १०)

(१९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान)

[२० मार्च, १९८६]

**मसाले पदार्थांच्या निर्यातीचा विकास करण्यासाठी आणि वेलचीच्या लागवडीवर नियंत्रण करण्यासह वेलची उद्योगावर नियंत्रण ठेवण्यासाठी, मंडळ घटित करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी हा अधिनियम संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. (१) या अधिनियमास, "मसाले पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६" असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल.

(३) तो, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "मंडळ" याचा अर्थ, कलम ३ याच्या पोटकलम (१) खाली घटित केलेले मसाले पदार्थ मंडळ, असा आहे ;

(ख) "वेलची" याचा अर्थ, वेलचीच्या झाडाचे फळ असा आहे आणि त्यामध्ये हिरवी वेलची, रंगहीन वेलची, रंगहीन पांढरी वेलची, उन्हात वाळवलेली वेलची, वेलचीच्या बिया, पूड केलेली वेलची आणि वेलचीपासून काढलेले तेल, यांचा समावेश आहे ;

(ग) "वेलचीचे झाड" याचा अर्थ, इलेटारीया कार्डमम मॅटन, अमोमम सुबलाटुम रॉक्सब् (Elettaria Cardamomum Maton, Ammomum Subulatum Roxb) आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे मंडळाने वेलचीचे झाड म्हणून जाहीर केले असेल असे कोणतेही इतर झाड, असा आहे ;

(घ) "प्रमाणपत्र" याचा अर्थ, कलम १२ अन्वये दिलेले प्रमाणपत्र, असा आहे ;

(ङ) "विक्रेता" याचा अर्थ, मसाले पदार्थांचा विक्रेता, असा आहे ;

(च) "संपदा" याचा अर्थ, वेलचीच्या झाडांसह इतर झाडांची ज्यात लागवड केली आहे अशा जमिनीचा अंतर्भाव असलेले एक युनिट म्हणून प्रशासित केलेले क्षेत्र, असा आहे ;

(छ) "निर्यात" आणि "आयात" याचा अर्थ, अनुक्रमे भूमार्गे, सागरीमार्गे आणि हवाईमार्गे माल भारतातून घेऊन जाणे किंवा आणणे, असा आहे ;

(ज) "निर्माणक" याचा अर्थ, मसाले पदार्थांचे निर्माणक, असा आहे ;

(झ) "सदस्य" याचा अर्थ, कलम ३ याच्या पोटकलम (३) अन्वये नियुक्त केलेला मंडळाचा सदस्य, असा आहे ;

(ञ) "मालक" याचा अर्थ, वेलची झाडाची लागवड केलेल्या जमिनीबाबत—

(एक) मालकाचा कोणताही अभिकर्ता ; आणि

(दोन) जमीन प्रत्यक्ष धारण केलेला गहाणदार, पट्टेदार किंवा इतर कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(ट) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये तयार केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ठ) "नोंदणीकृत संपदा" याचा अर्थ, कलम ८ च्या पोटकलम (१) अन्वये नोंदणी केली आहे अशा मालकाच्या बाबतीतील संपदा, असा आहे आणि यात या पोटकलमाच्या तरतुदींअन्वये नोंदणी करणे आवश्यक आहे अशा मालकाच्या बाबतीतील कोणत्याही संपदेचा समावेश असेल ;

(ड) " नोंदणीकृत मालक " याचा अर्थ, कलम ८ च्या पोटकलम (१) अन्वये ज्या नोंदणीकृत संपदेचा किंवा नोंदणी केली आहे किंवा नोंदणी करणे आवश्यक आहे अशा संपदेचा मालक, असा आहे ; आणि

(ढ) " मसाले पदार्थ " याचा अर्थ, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले मसाले पदार्थ, असा आहे :

परंतु, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तसे करणे आवश्यक आहे किंवा जनहिताच्या दृष्टीने उचित आहे याबद्दल त्याची खात्री पटल्यास अशा, मसाल्याच्या पदार्थाच्या अनुसूचीमध्ये अन्य एखाद्या मसाल्याच्या पदार्थाचा समावेश करील किंवा त्यामधून काढून टाकील.

## प्रकरण दोन

## मसाले पदार्थ मंडळ

**मंडळ घटित करणे आणि कायद्याद्वारे संस्थापित करणे.**

**३.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, " मसाले पदार्थ मंडळ " या नावाचे एक मंडळ घटित करील.

(२) मंडळ हे वर नमूद केलेल्या नावाचा एक निगमनिकाय असेल आणि त्याची अखंड परंपरा असेल व त्याची एक सामान्य मुद्रा असेल आणि त्यास या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने संविदा करण्याचा अधिकार असेल आणि उक्त नावाने त्यास व त्याच्यावर दावा लावता येईल.

(३) मंडळ, विहित केल्यानुसार बत्तीसपेक्षा जास्त सदस्य संख्या नसलेल्या सदस्यांचे मिळून बनलेले असेल आणि याबाबतीत तयार केलेल्या नियमांमध्ये अन्यथा तरतूद केली नसेल तर, मंडळ खालील सदस्यांचे मिळून बनलेले असेल ते असे :—

(क) अध्यक्ष ;

(ख) संसदेचे तीन सदस्य, त्यांपैकी लोकसभेवर निवडून आलेले दोन आणि राज्यसभेवर निवडून आलेला एक सदस्य ;

(ग) केंद्र सरकारच्या पुढील मंत्रालयांचे प्रतिनिधित्व करणारे अनुक्रमे तीन सदस्य—

(एक) वाणिज्य ;

(दोन) कृषि ; आणि

(तीन) वित्त ;

(घ) मसाले पदार्थ पिकविणाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे सहा सदस्य ;

(ङ) मसाले पदार्थांच्या निर्यातकांचे प्रतिनिधित्व करणारे अकरा सदस्य ;

(च) मुख्य मसाले पदार्थांची निर्मिती करणाऱ्या राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे तीन सदस्य ;

(छ) पाच सदस्यांपैकी प्रत्येकी एक सदस्य पुढील बाबींचे प्रतिनिधित्व करणारा असेल :—

(एक) नारळ, सुपारी आणि मसाले पदार्थ विकास संचालनालय, कालिकत ;

(दोन) भारतीय आवेष्टन संस्था, मुंबई ;

(तीन) केंद्रीय अन्न तंत्रज्ञान आणि संशोधन संस्था, म्हैसूर ;

(चार) विभागीय संशोधन प्रयोगशाळा, त्रिवेंद्रम ; आणि

(पाच) केंद्रीय पीक प्रतिरोपण संशोधन संस्था, कासारगोडी.

(४) मंडळाच्या सदस्याचे पद, तिचा धारक सुरुवातीला संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य होण्यासाठी निवडला गेल्यामुळे किंवा सदस्य झाल्यामुळे, निरर्ह करण्यात येणार नाही.

(५) सदस्यांचा पदावधी आणि सदस्यांच्या सेवेच्या इतर शर्ती, विहित केल्यानुसार असतील.

(६) अध्यक्ष, मंडळाच्या बैठकांचे अध्यक्षस्थान सांभाळून, मंडळाने त्याला सोपविलेल्या मंडळाच्या अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील आणि विहित करण्यात आलेले इतर अधिकार व कर्तव्ये देखील पार पाडील.

(७) मंडळ, आपल्या सदस्यांमधून उपाध्यक्षाची निवड करील, तो विहित केले असेल त्याप्रमाणे अध्यक्षांचे असे अधिकार वापरील आणि अशी कार्ये पार पाडील किंवा अध्यक्षाने त्याच्यावर सोपविलेली कार्ये पार पाडील.

(८) मंडळाचे कोणतेही कृत्य किंवा कार्यवाही ही केवळ याच कारणामुळे विधिअग्राह्य ठरवता येणार नाही—

(क) मंडळातील कोणतेही रिक्त पद किंवा मंडळाच्या घटनेतील कोणताही दोष ;

(ख) मंडळाचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीतील कोणताही दोष ;

(ग) प्रकरणाच्या गुणदोषावर परिणाम न करणारी, मंडळाच्या कार्यपद्धतीमधील कोणतीही अनियमितता.

**सचिव आणि इतर अधिकारी.**

४. (१) या अधिनियमान्वये मंडळ आवश्यक वाटल्यास आपली कामे कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी सचिव आणि असे इतर अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती करील.

(२) मंडळाचे, सचिव आणि इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विनियमांन्वये निर्धारित केल्याप्रमाणे असतील.

**सल्लागार समित्या.**

५. (१) याबाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून मंडळ, वेळोवेळी, त्याची कामे कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे अशा समित्या घटित करू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये घटित केलेली प्रत्येक समिती, मंडळाला योग्य वाटेल एवढ्या व्यक्तींची मिळून बनलेली असेल.

**वेलची मंडळाची आणि मसाले पदार्थ निर्यात प्रचालन परिषदेची मत्ता व दायित्वे मंडळाकडे हस्तांतरित करणे.**

६. (१) या अधिनियमाच्या प्रारंभापासूनच,—

(क) वेलची मंडळाकडे आणि मसाले पदार्थ निर्यात प्रचालन परिषदेकडे निहित असलेली सर्व संपत्ती व इतर मत्ता, अशा प्रारंभापूर्वीच, मंडळाकडे निहित होईल.

(ख) वेलची मंडळ किंवा मसाले पदार्थ निर्यात प्रचालन परिषद यांच्या प्रयोजनांसाठी किंवा प्रयोजनांच्या संबंधी अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी, वेलची मंडळ किंवा मसाले पदार्थ निर्यात प्रचालन परिषद यांच्याद्वारे, यांच्याबरोबर, किंवा यांच्याकरिता घेण्यात आलेली सर्व ऋणे, पत्करलेली सर्व आबंधने आणि दायित्वे, करण्यात आलेल्या सर्व संविदा आणि केल्या जाणाऱ्या सर्व बाबी आणि गोष्टी ह्या, मंडळाद्वारे, मंडळाबरोबर किंवा मंडळाकरिता घेण्यात आलेली सर्व ऋणे, पत्करलेली सर्व आबंधने आणि दायित्वे, करण्यात आलेल्या सर्व संविदा आणि केल्या जाणाऱ्या सर्व बाबी आणि गोष्टी आहेत असे समजण्यात येईल.

(ग) अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी वेलची मंडळास किंवा मसाले पदार्थ निर्यात प्रचालन परिषदेस देय असलेली पैशाची सर्व रक्कम मंडळास, देय असल्याचे समजण्यात येईल.

(घ) सुरू करण्यात आलेले सर्व दावे व इतर कायदेशीर कारवाई किंवा अशा प्रारंभाच्या लगत-पूर्वी वेलची मंडळ किंवा मसाले पदार्थ निर्यात प्रचालन परिषद यांच्याद्वारे किंवा यांच्याविरुद्ध सुरू करण्यात आलेले असे दावे किंवा कायदेशीर कारवाई, मंडळाद्वारे पुढे चालू राहतील किंवा मंडळाच्या विरुद्ध सुरू राहतील.

(ङ) अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी वेलची मंडळ किंवा मसाले पदार्थ निर्यात प्रचालन परिषद यातील पद धारण करणारा प्रत्येक कर्मचारी, अशा प्रारंभाच्या दिवशी, जर तेथे अशा सेवा निहित झाल्या नसत्या तर त्याला त्यावेळी तेथे अनुज्ञेय असलेले निवृत्तिवेतन, उपदान व इतर गोष्टी यांसारखे हक्क व विशेषाधिकारांसहित मंडळामधील त्याचे पद किंवा सेवा धारण करील ; आणि मंडळामधील त्याची सेवा, यथोचितरीत्या समाप्त करण्यात आली नसेल तर व ती समाप्त करण्यात येईपर्यंत किंवा मंडळाद्वारे त्याच्या पारिश्रमिक व सेवेच्या इतर अटींमध्ये यथोचितरीत्या फेरफार करण्यात येईपर्यंत चालू ठेवावी लागेल.

(२) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये मंडळाद्वारे तिच्या नियमित सेवेत सामावून घेतलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यास त्या अधिनियमान्वये किंवा इतर कायद्यान्वये असा कर्मचारी कोणत्याही भरपाईस हक्कदार असणार नाही आणि कोणत्याही न्यायालयात, न्यायाधिकरणात किंवा इतर प्राधिकरणात असा दावा विचारात घेतला जाणार नाही.

मंडळाची कामे.

७. (१) मंडळ,---

(एक) मसाले पदार्थांच्या निर्यातीचा विकास, प्रचालन आणि विनियमन करील ;

(दोन) मसाले पदार्थांची निर्यात करण्यासाठी प्रमाणपत्र देईल आणि त्यासाठी दलालांची नोंदणी करील ;

(तीन) मसाले पदार्थ निर्यातीच्या प्रचालनासाठीच्या कार्यक्रमांची आणि प्रकल्पांची जबाबदारी पत्करील ;

(चार) मसाले पदार्थांच्या आवेष्टन आणि प्रतवारीचे तंत्र, संस्करण, दर्जा यांच्या सुधारणेसाठी अभ्यास करण्यास व संशोधन करण्यास सहाय्य आणि उत्तेजन देईल ;

(पाच) निर्यातीसाठी मसाले पदार्थांच्या किंमतीच्या स्थिरीकरणासंबंधी आटोकाट प्रयत्न करील ;

(सहा) मसाले पदार्थांच्या निर्यातीसाठी योग्य मानक दर्जा विकसित करील आणि "गुणांकन" याद्वारे दर्जा प्रमाणनाचा परिचय करून देईल ;

(सात) निर्यातीसाठी मसाले पदार्थांचा दर्जा नियंत्रण करील ;

(आठ) मसाले पदार्थांची निर्यात करणाऱ्या निर्माणकांना, विहित केले असेल त्या अटी आणि शर्तींना अधीन राहून अनुज्ञप्ती देईल ;

(नऊ) निर्यातीच्या वाढीच्या हितासाठी जर त्याला आवश्यक वाटल्यास कोणताही मसाले पदार्थ बाजारात आणील ;

(दहा) मसाले पदार्थांसाठी परदेशात वखारींची सुविधा करील ;

(अकरा) संकलन आणि प्रसिद्धीसाठी मसाले पदार्थांशी संबंधित आकडेवारी गोळा करील ;

(बारा) कोणत्याही मसाले पदार्थांच्या विक्रीसाठी केंद्र सरकारची पूर्वमान्यता घेऊन आयात करील ; आणि

(तेरा) मसाले पदार्थांच्या आयात व निर्यातीशी संबंधित बाबींवर केंद्र सरकारला सल्ला देईल.

(२) तसेच मंडळ---

(एक) वेलची लागवड करणाऱ्या लागवडदारांमध्ये एकत्रित प्रयत्नांचे प्रचालन करील ;

(दोन) वेलची लागवड करणाऱ्या लागवडदाराला पारिश्रमिकाच्या रूपाने मिळणाऱ्या प्राप्तीची खात्री करून देईल ;

(तीन) वेलचीच्या पुनर्लागवडीसाठी आणि वेलची लागवडीच्या क्षेत्रांची वाढ करण्यासाठी, वेलचीच्या लागवडीच्या सुधारित पद्धतीसाठी आणि संस्करणासाठी आर्थिक किंवा इतर सहाय्यांची तरतूद करील ;

(चार) वेलचीच्या विक्रीचे विनियमन आणि तिच्या किंमतीचे स्थिरीकरण करील ;

(पाच) वेलचीची चाचणी आणि वेलचीच्या श्रेणीचा दर्जा निश्चित करण्याचे प्रशिक्षण देईल ;

(सहा) वेलचीचा खप वाढविणे आणि त्या प्रयोजनासाठी प्रचार करील ;

(सात) वेलचीचे दलाल (लिलाव करणाऱ्यांसह) व वेलचीच्या व्यवसायामध्ये गुंतलेल्या व्यक्ती यांची नोंदणी करील व लायसन देईल ;

(आठ) वेलचीच्या खरेदी-विक्रीत सुधारणा करील ;

(नऊ) वेलचीच्या उद्योगाशी संबंधित कोणत्याही बाबतीत विहित केलेले लागवडदार, विक्रेते व अशा कोणत्याही व्यक्ती यांच्याकडून आकडेवारी गोळा करील ; अशा प्रकारे गोळा केलेली आकडेवारी किंवा त्यातील काही भाग किंवा त्यातील उतारे प्रसिद्ध करील ;

(दहा) कामगारांसाठी काम करण्यास पोषक वातावरण निर्मिती करील आणि सुविधांची आणि प्रोत्साहनाची तरतूद करील आणि त्यात सुधारणा करील ;

(अकरा) शास्त्रीय, तांत्रिक आणि आर्थिक संशोधन हाती घेईल आणि त्यास सहाय्य करील किंवा उत्तेजन देईल.

## प्रकरण तीन

## वेलची संपदांच्या मालकांची नोंदणी

वेलची संपदांच्या मालकांची नोंदणी.

**८.** (१) वेलचीच्या झाडाची लागवड करणारा प्रत्येक मालक अशी जमीन—मग ती एका संपदेत किंवा एकापेक्षा अधिक संपदेत समाविष्ट झालेली असो—अशा संपदेचा किंवा अशा संपदांचा तो प्रथमच मालक झाला त्या दिनांकापासून एक महिन्याच्या समाप्तीपूर्वी, राज्य शासनाकडून या संबंधात नियुक्त केलेल्या नोंदणी अधिकाऱ्याकडे, त्याच्या मालकीच्या प्रत्येक संपदेच्या संबंधात मालक म्हणून नोंदणी करून घेण्यासाठी अर्ज करील :

परंतु, राज्य शासन, अशा वाजवी कारणांसाठी, त्याला योग्य वाटेल अशा कालावधीसाठी नोंदणीकरिताची कालमर्यादा वाढवू शकेल.

(२) एकदा झालेली नोंदणी, नोंदणी अधिकाऱ्याकडून ती रद्द होईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

**९.** (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कलम ८ च्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम तयार करील.

(२) पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांत, नोंदणी करण्याच्या आणि नोंदणी रद्द करण्याच्या अर्जाचा नमुना, अशा अर्जासाठी देय असलेली फी, अशा अर्जात समाविष्ट करावयाचा तपशील, नोंदणी मान्य करण्याबाबत किंवा रद्द करण्याबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती, नोंदणी अधिकाऱ्याने ठेवावयाची नोंदवही आणि नोंदणी अधिकाऱ्याने मंडळाला पुरवावयाची माहिती विहित करता येईल.

नोंदणीकृत मालकांनी विवरण तयार करणे.

**१०.** (१) नोंदणीकृत मालक, मंडळाकडे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा वेळेत अशा पद्धतीने विवरण सादर करील.

(२) मंडळ, या कलमान्वये, तयार केलेल्या कोणत्याही संपदेच्या विवरणाची अचूकता पडताळण्यासाठी किंवा त्या संपदेच्या उत्पादन क्षमतेची खात्री करून घेण्यासाठी कोणत्याही वेळी कोणत्याही संपदेला भेट देण्यासाठी एका अधिकाऱ्याला प्राधिकृत करील.

## प्रकरण चार

## मसाले पदार्थ निर्यात करण्यासाठी प्रमाणपत्र

कोणतीही व्यक्ती प्रमाणपत्राशिवाय मसाले पदार्थ निर्यात करणार नाही.

**११.** या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर प्रमाणपत्राखाली वगळण्यात आलेल्या व प्रमाणपत्रानुसार असलेल्या कोणत्याही मसाले पदार्थांच्या निर्यातीचा व्यवसाय सुरू करणार नाही किंवा चालू ठेवणार नाही :

परंतु, जी व्यक्ती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी मसाले पदार्थ निर्यातीचा व्यवसाय करत होती ती अशा प्रारंभापासून तीन महिन्यांच्या कालावधीसाठी व्यवसाय पुढे चालू ठेवील आणि जर त्याने अशा प्रमाणपत्रासाठी उक्त तीन महिन्यांच्या कालावधीत अर्ज केला असेल तर, असा अर्ज निकालात काढीपर्यंत व्यवसाय पुढे चालू ठेवील.

**स्पष्टीकरण.**—या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी याचा या कलमातील संदर्भाचा अर्थ, अनुसूचीमध्ये ज्या दिवसापासून असा मसाले पदार्थ जादा दाखल करण्यात आला आहे त्या दिनांकाच्या संदर्भानुसार कलम २ च्या खंड (ढ) च्या परंतुकान्वये अधिसूचनेद्वारे अनुसूचीत जादा दाखल करण्यात येणाऱ्या कोणत्याही मसाले पदार्थांच्या संबंधात लावण्यात येईल.

प्रमाणपत्र देणे.

**१२.** (१) प्रमाणपत्र मिळण्यासाठी करावयाचा अर्ज मंडळाकडे अशा नमुन्यात करण्यात येईल आणि त्यामध्ये विहित करण्यात आलेला असा तपशील समाविष्ट असेल आणि विहित केलेल्या फीची, प्रदान केल्याचा पुरावा म्हणून देण्यात आलेली पावती त्यासोबत जोडण्यात येईल,

(२) असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर मंडळ,

(क) अर्ज विहित नमुन्यात नसेल किंवा अर्जदाराने अर्जामध्ये विहित करण्यात आलेला कोणताही तपशील भरला नसेल तर असा अर्ज, अर्जदारास परत पाठवील ; किंवा

(ख) अर्ज विहित नमुन्यात असेल आणि अर्जात विहित केलेला तपशील पूर्णपणे भरलेला असेल तर अर्जदाराला, विनियमांद्वारे निर्धारित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीनतेने प्रमाणपत्र देईल.

प्रमाणपत्र रद्द करणे, किंवा निलंबन करणे इत्यादी.

**१३.** (१) मंडळ, खालीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक कारणास्तव प्रमाणपत्र रद्द करू शकेल ते असेल—

(क) प्रमाणपत्रधारकाने प्रमाणपत्राच्या कोणत्याही अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यास ; आणि

(ख) केंद्र सरकारचे जर असे मत असेल की, सामान्य जनतेच्या हितासाठी प्रमाणपत्र रद्द करणे आवश्यक आहे.

(२) जेव्हा मंडळाचे, अशी कारणे जी लेखी अभिलिखित केली जातील, पोटकलम (१) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही आधारांवर प्रमाणपत्र रद्द करण्याच्या त्या प्रश्नावर विचार होईपर्यंत, समाधान झाले की, तसे करणे आवश्यक आहे तर, मंडळ लेखी आदेशाद्वारे, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे अशा पंचेचाळीस दिवसांपेक्षा जास्त होणार नाहीत एवढ्या कालावधीसाठी प्रमाणपत्राचे प्रवर्तन निलंबित करील आणि प्रमाणपत्राची नोंदणी रद्द करण्यात यावी किंवा कसे या प्रश्नाची निश्चिती करण्यात येईपर्यंत प्रमाणपत्राचे निलंबन का वाढविण्यात येऊ नये याबाबतची कारणे असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत प्रमाणपत्रधारकास दाखवण्यास भाग पाडील.

(३) या कलमान्वये नोंदणी रद्द करण्याचा कोणताही आदेश संबंधित व्यक्तीला अशी नोंदणी रद्द करण्यासाठीच्या कारणांसंबंधी आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय काढण्यात येणार नाही.

अपील.

**१४.** (१) कलम १३ अन्वये काढलेल्या आदेशामुळे पीडित झालेली कोणतीही व्यक्ती विहित करण्यात येईल अशा कालावधीत केंद्र सरकारकडे अपील दाखल करू शकेल.

(२) जर याबाबतीत विहित करण्यात आलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर अपील दाखल करण्यात आले असेल तर ते दाखल केले जाणार नाही :

परंतु, अपील दाखल करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या कालावधीनंतर अपील दाखल करण्यात आले नाही याबाबत त्यांच्याकडे वाजवी कारणे होती असे अपीलकर्त्याने केंद्र सरकारला पटवून दिले तर विहित करण्यात आलेल्या कालावधीनंतर अपील दाखल करता येईल.

(३) या कलमान्वये करण्यात येणारे प्रत्येक अपील हे अशा नमुन्यात व त्यासोबत अपिलाविरूद्धच्या आदेशाची प्रत जोडून तसेच विहित करण्यात आलेली फी भरून करण्यात येईल.

(४) अपील निकालात काढण्याची कार्यपद्धती विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल :

परंतु, अपील निकालात काढण्यापूर्वी, अपीलकर्त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(५) केंद्र सरकार अपिलाविरुद्ध दिलेला आदेश कायम करू शकेल, त्यात फेरबदल करू शकेल किंवा तो परत घेऊ शकेल.

प्रमाणपत्राखेरीज निर्यात करण्यास परवानगी देण्याचा अधिकार.

**१५.** केंद्र सरकार, जनहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा उचित आहे अशी त्याची खात्री पटल्यास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, कोणत्याही असल्यास, अशा शर्तींच्या अधीनतेने कोणत्याही निगमनिकायास किंवा इतर अभिकरणास, प्रमाणपत्राशिवाय मसाले पदार्थांची निर्यात करण्याचा व्यवसाय प्रारंभ करण्यास किंवा चालविण्यास परवानगी देईल.

## प्रकरण पाच

## केंद्र सरकारचे नियंत्रण

वेलचीच्या वितरणाचा आणि दर नियंत्रणाचा अधिकार.

**१६.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रामध्ये** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वर्णनाच्या वेलचीच्या बाबतीत—

(क) वेलचीचा लागवडदार किंवा वेलचीचा विक्रेता, घाऊक विक्रेता किंवा किरकोळ विक्रेता यांच्याकडून आकारण्यात येईल अशी कमीत कमी किंवा जास्तीत जास्त किंमत किंवा कमाल आणि किमान किंमती—मग त्या भारतीय बाजारपेठेसाठी असोत किंवा निर्यातीसाठी असोत ; आणि

(ख) कोणत्याही व्यक्तीने एका व्यवहारात विक्री केलेले असे कमाल परिमाण, निश्चित करील.

(२) पोटकलम (१) अन्वये प्रदान केलेल्या पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, त्याखाली केलेल्या कोणत्याही आदेशात—

(क) वेलचीच्या उत्पादन, पुरवठा किंवा वितरणाच्या कामात किंवा वेलचीचा व्यापार किंवा वाणिज्य या कामात गुंतलेल्या व्यक्तींना त्यांच्या व्यवसायाशी संबंधित अशी पुस्तके, लेखे आणि अहवाल निरीक्षणासाठी ठेवण्यात व हजर करण्यात आणि आदेशात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्यासंबंधातील अशी माहिती देण्यास भाग पाडण्यासाठी, आणि

(ख) विशेषकरून जागा, वाहने, जहाजे व विमाने यांमध्ये प्रवेश करणे आणि झडती घेणे यासहित अशा इतर गोष्टींसाठी आणि आदेशाचे उल्लंघन झालेले आहे, होत आहे किंवा होणार आहे अशी खात्री झाल्यास, अशी व्यक्ती जी वेलचीच्या संबंधात अशी झडती घेण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे अभिग्रहण करण्यासाठी तरतूद करील.

**वेलचीच्या आयातीत मनाई करण्याचा किंवा नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.**

**१७.** केंद्र सरकार, **राजपत्रामध्ये** आदेश प्रसिद्ध करून, सर्वसाधारणतः किंवा प्रकरणांच्या विनिर्दिष्ट वर्गवारीनुसार वेलचीच्या आयतीस मनाई करण्यासाठी, निर्बंध घालण्यासाठी किंवा अन्यथा नियंत्रण ठेवण्यासाठी तरतूद करील.

**केंद्र सरकारचा निदेश देण्याचा अधिकार.**

**१८.** (१) या अधिनियमाच्या पूर्वोक्त तरतुदींना बाध न येता मंडळ, या अधिनियमान्वये आपली कार्ये व कर्तव्ये पार पाडीत असताना, केंद्र सरकार, धोरणात्मक प्रश्नावर वेळोवेळी त्याला जे लेखी निदेश देईल ते त्यास बंधनकारक असतील :

परंतु या पोटकलमान्वये कोणताही निदेश देण्यापूर्वी व्यवहार्य असेल तेथवर, मंडळाला आपले मत प्रदर्शित करण्याची संधी देण्यात येईल.

(२) केंद्र सरकारचा निर्णय–मग तो धोरणात्मक प्रश्न असो वा नसो–अंतिम असेल.

**केंद्र सरकारचा मंडळ निष्प्रभावित करण्याचा अधिकार.**

**१९.** (१) जर केंद्र सरकारचे कोणत्याही वेळी असे मत झाले की,—

(क) मंडळ, गंभीर निकडीच्या परिस्थितीत त्याच्याकडे सोपविलेली किंवा या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये पार पाडावयाची कार्ये व कर्तव्ये यांची अंमलबजावणी करण्यास असमर्थ आहे ; किंवा

(ख) मंडळाने, केंद्र सरकारने या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यास किंवा त्याच्याकडे सोपविण्यात आलेली किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये पार पाडावयाची कार्ये व कर्तव्ये यांची अंमलबजावणी करण्यात कसूर केली आहे आणि अशा कसुरीच्या परिणामी मंडळाची आर्थिक स्थिती किंवा मंडळाची प्रशासन व्यवस्था खालावलेली आहे ; किंवा

(ग) अशा विद्यमान परिस्थितीमध्ये जनहिताच्या दृष्टीने असे करणे आवश्यक असेल तर,

केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, मंडळाला सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही अशा, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी निष्प्रभावित करील.

(२) पोटकलम (१) अन्वये मंडळ निष्प्रभावित करण्याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्यावर—

(क) ज्या दिनांकास मंडळ निष्प्रभावित करण्यात येईल त्या दिनांकापासून सर्व सदस्य त्यांची पदे रिक्त करतील ;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये मंडळाद्वारे किंवा वतीने अंमलात आणता येतील किंवा पार पाडता येतील असे सर्व अधिकार, कार्ये व कर्तव्ये पोटकलम (३) अन्वये मंडळ पुनर्घटित होईपर्यंत केंद्र सरकार निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून अंमलात आणले जातील व पार पाडले जातील ; आणि

(ग) पोटकलम (३) अन्वये मंडळ पुनर्घटित होईपर्यंत मंडळाची स्वतःची किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली सर्व मालमत्ता केंद्र सरकारकडे निहित होईल.

(३) पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निष्प्रभाविततेच्या कालावधीच्या समाप्तीनंतर, केंद्र सरकार, नवीन नियुक्तीद्वारे मंडळ पुनर्घटित करील आणि अशी नियुक्ती करण्यासाठी पोटकलम २ च्या खंड (क) अन्वये ज्या व्यक्तीने किंवा व्यक्तींनी त्याचे/त्यांची पदे रिक्त केली अशा व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या प्रकरणामध्ये त्याला/त्यांना अनर्ह समजण्यात येणार नाही :

परंतु, केंद्र सरकार, निष्प्रभाविततेचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, कोणत्याही वेळी, या पोटकलमान्वये कार्यवाही करील.

(४) केंद्र सरकार, पोटकलम (१) अन्वये अधिसूचना काढील व या कलमान्वये केलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा व अशी कार्यवाही करण्यास उद्‌भवलेल्या परिस्थितीचा संपूर्ण अहवाल लवकरात लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवील.

## प्रकरण सहा

## वित्तव्यवस्था, लेखे आणि लेखापरीक्षा

केंद्र सरकारकडून अनुदान व कर्जे.

२०. केंद्र सरकार यासंबंधात, संसदेने कायद्याद्वारे केलेल्या नियत विनियोजनानंतर त्या शासनास आवश्यक असल्याप्रमाणे अशा रकमेचे अनुदान आणि कर्जे मंडळाला देईल.

मंडळाचा निधी.

२१. (१) मसाले पदार्थ मंडळ निधी या नावाचा एक निधी घटित करण्यात येईल आणि त्यामध्ये---

(क) कलम २० अन्वये केंद्र सरकारकडून मंडळाला मिळालेले कोणतेही अनुदान आणि कर्जे ;

(ख) या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या प्रमाणपत्राच्या संबंधात आकारण्यात आलेली व गोळा करण्यात आलेली सर्व फी ; आणि

(ग) केंद्र सरकारने याबाबतीत निर्णय दिल्याप्रमाणे मंडळाला अशा इतर साधनांपासून मिळालेल्या सर्व रकमा,

जमा करण्यात येतील.

(२) निधी---

(क) मंडळाचे सभासद, अधिकारी आणि इतर कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि इतर पारिश्रमिक ;

(ख) कलम ७ अन्वये त्याची कार्ये पार पाडताना येणारा मंडळाचा खर्च ; आणि

(ग) या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेली उद्दिष्टे आणि प्रयोजने यांवरील खर्च,

भागवण्यासाठी वापरण्यात येईल.

अर्थसंकल्प.

२२. मंडळ, प्रत्येक वित्तीय वर्षात विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा वेळेत, पुढील वित्तीय वर्षाकरिता, मंडळाची अंदाजित प्राप्ती व खर्च दाखविणारा, अर्थसंकल्प तयार करील आणि केंद्र सरकारकडे तो अग्रेषित करील.

वार्षिक अहवाल.

२३. मंडळ, प्रत्येक वित्तीय वर्षात त्याच्या वार्षिक अहवालात विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा वेळेत, मागील वित्तीय वर्षातील त्याच्या कामांचा संपूर्ण तपशील देणारा वार्षिक अहवाल तयार करील आणि त्याची एक प्रत केंद्र सरकारकडे सादर करील.

लेखे व लेखापरीक्षा.

२४. मंडळाचे लेखे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने ठेवण्यात येतील आणि त्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल आणि केंद्र सरकार विहित करील अशा दिनांकापूर्वी मंडळ त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह आपले लेखापरीक्षा केलेले लेखे केंद्र सरकारला सादर करील.

२५. केंद्र सरकार वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील. संसदेत वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकांचा अहवाल मांडणे.

## प्रकरण सात

## संकीर्ण

२६. या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमान्वये कोणतेही विवरणपत्र सादर करणे जिला आवश्यक आहे अशी कोणतीही व्यक्ती असे विवरणपत्र सादर करण्यास कसूर करील किंवा सादर केलेल्या विवरणपत्रातील कोणताही तपशील चुकीचा दिला असेल आणि त्याला तो चुकीचा असल्याचे माहित आहे किंवा खरा असल्याबाबत त्याची खात्री नसेल, अशी व्यक्ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र राहील. चुकीची विवरणपत्रे तयार करण्याबाबत शास्ती.

२७. कोणतीही व्यक्ती— मंडळाचे अधिकारी किंवा सदस्य यांना आपली कर्तव्ये पार पाडताना अडथळा आणण्यासाठी किंवा पुस्तके आणि अहवाल दाखल करण्यास निष्फळ होण्यासाठी शास्ती.

(क) केंद्र सरकारकडून किंवा मंडळाकडून या बाबतीत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती किंवा अध्यक्षांकडून लेखी प्राधिकृत केलेला कोणताही सदस्य किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या मंडळाचा कोणताही अधिकारी किंवा इतर कर्मचारी यांना, या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमाअन्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करताना किंवा त्याच्यावर लादलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडताना अडथळा आणील ; किंवा

(ख) नियंत्रणात असलेली किंवा ताब्यात असलेली कोणतीही लेखापुस्तके किंवा इतर अहवाल या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमान्वये दाखल करणे ज्यावेळी आवश्यक असेल त्यावेळी कोणतीही अशी लेखापुस्तके किंवा अहवाल दाखल करण्यात अपयशी ठरल्यास ;

सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

२८. (१) जर कोणत्याही व्यक्तीने, कलम १६ अन्वये केलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्यास ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कालावधीच्या कारावासाच्या किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल ; आणि ज्या मालमत्तेच्या संबंधातील आदेशाचे किंवा त्याच्या काही भागाचे उल्लंघन झाले आहे असे न्यायालयास उचित वाटते तर ती मालमत्ता केंद्र सरकारकडे समपहृत होईल. दर, इत्यादींच्या नियंत्रणाशी संबंधित आदेशाचे उल्लंघन केल्यास शास्ती.

(२) कलम १६ खालील कोणत्याही आदेशाचे, कोणत्याही व्यक्तीने उल्लंघन करण्याचा प्रयत्न केल्यास किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा दिल्यास त्या आदेशाचे उल्लंघन केले असे मानण्यात येईल.

२९. कोणत्याही व्यक्तीने कलम ११ किंवा कलम १७ अन्वये केलेल्या तरतुदींनुसार काढलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्यास, ती सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याच्या तरतुदींअन्वये त्यास ती पात्र असेल अशा कोणत्याही अधिहरणास किंवा शास्तीला हानी न पोचवता एका वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल. कलम ११ किंवा कलम १७ खाली करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्यास शास्ती.

३०. जो कोणी, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा या तरतुदींशिवाय त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा विनियम यांचे उल्लंघन करील किंवा उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा देईल, त्यास कलम २६, २७, २८ किंवा २९ मध्ये उल्लंघनासाठी तरतूद केल्यानुसार सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षा होतील, आणि सतत होणाऱ्या उल्लंघनाच्या प्रकरणामध्ये अशा पहिल्या उल्लंघनाकरिता अपराध सिद्ध झाल्यानंतर असे उल्लंघन चालू राहिल्यास प्रत्येक दिवसाकरिता पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल एवढा अतिरिक्त दंड होईल. इतर शास्ती.

३१. (१) या अधिनियमाखालील अपराध, ज्यावेळी कोणत्याही कंपनीने केला असेल तर, अपराध घडला त्यावेळी कंपनीचे कामकाज चालविण्याबद्दल कंपनीची कोणतीही प्रभारी म्हणून असलेली आणि कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती तसेच कंपनीही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षेस पात्र असेल : कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु या पोटकलमातील कोणतीही बाब, या अधिनियमामध्ये तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेसाठी, अशा कोणत्याही व्यक्तीस पात्र ठरविणार नाही, जर ती व्यक्ती असे सिद्ध करील की, अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये यासाठी तिने सर्व वाजवी खबरदारी घेतली होती.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध कंपनीकडून घडलेला असेल आणि असे सिद्ध झाले की, अपराध कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा कंपनीचा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूक संमतीने किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हयगयीमुळे घडला असल्यास, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा मिळण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय, असा आहे आणि त्यात एखादी भागीदारी संस्था आणि व्यक्तींचे इतर अधिसंघ यांचा अंतर्भाव होतो ; आणि

(ख) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधातील "संचालक" याचा अर्थ, भागीदारी संस्थेमधील भागीदार, असा आहे.

**१९६२चा अधिनियम ५२ च्या तरतुदी, मसाले पदार्थांची निर्यात व वेलचीची आयात करणे यास लागू होणे.**

३२. (क) या अधिनियमाचे कलम ११ लागू होते असे सर्व मसाले पदार्थ ; आणि

(ख) या अधिनियमाच्या कलम १७ अन्वये कोणतेही आदेश लागू होतात अशी वेलची,

सीमाशुल्क अधिनियम, १९६२ याच्या कलम ११ अन्वये आयात आणि निर्यातीत मनाई किंवा निर्बंधित केलेला माल असल्याचे समजण्यात येईल व त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी त्यानुसार प्रभावित होतील.

**केंद्र सरकारची पूर्वमंजुरी.**

३३. केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीखेरीज, या अधिनियमान्वये कोणत्याही शिक्षापात्र अपराधासाठी खटला दाखल करता येणार नाही.

**प्रत्यायोजन.**

**३४.** मंडळ, त्याला आवश्यक वाटल्यास, सर्वसाधारण किंवा विशेष अशा लेखी आदेशांद्वारे या अधिनियमाखाली (कलम ३९ खालील अधिकार खेरीज करून) त्याचे असे अधिकार व कार्य, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा शर्ती व मर्यादा, कोणत्याही असल्यास, त्यांना अधीन राहून, मंडळाचा अध्यक्ष किंवा अन्य कोणताही सदस्य किंवा मंडळाचा कोणताही अधिकारी यांच्याकडे सोपवील.

**सदस्य, अधिकारी व मंडळाचे कर्मचारी हे लोकसेवक असणे.**

**३५.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींनुसार, मंडळाचे सर्व सदस्य, अधिकारी व मंडळाचे इतर कर्मचारी हे कार्य करीत असताना किंवा तसे अभिप्रेत असताना ते, भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.**

**३६.** या अधिनियमाला अनुलक्षून किंवा या अधिनियमान्वये तयार केलेले कोणतेही नियम किंवा विनियम यांना अनुलक्षून सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल शासन किंवा मंडळ किंवा त्यांच्याकडून नियुक्त करण्यात आली असेल अशी समिती किंवा मंडळाचा किंवा अशा समितीचा कोणताही सदस्य किंवा शासनाचा किंवा मंडळाचा कोणताही अधिकारी किंवा कोणताही कर्मचारी किंवा शासनाने किंवा मंडळाने प्राधिकृत केलेली असेल अशी अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येणार नाही.

**प्रवेश करण्याचा अधिकार.**

**३७.** या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी, याबाबत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, मंडळाकडून याबाबत सर्वसाधारणपणे किंवा विशेषत: प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती असे करणे आवश्यक असेल तेव्हा, कोणत्याही वेळी, कोणत्याही जमिनीवर किंवा जागेत प्रवेश करू शकेल आणि कोणतीही तपासणी किंवा चौकशी करू शकेल किंवा विहित करण्यात येईल त्यानुसार अशी कोणतीही इतर कृती किंवा गोष्ट करू शकेल :

परंतु, अशी व्यक्ती, कोणत्याही इमारतीत किंवा कोणत्याही जोडून असलेल्या अंगणात किंवा निवासगृहाला जोडून असलेल्या बागेत (त्याच्या भोगवटादाराच्या संमतीखेरीज) अशा भोगवटादारास

किमान चोवीस तास अगोदर त्याच्या असे करण्याच्या उद्देशाबाबतची पूर्वसूचना देणारी लेखी नोटीस दिल्याखेरीज, प्रवेश करणार नाही.

**३८.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम तयार करील. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, खालीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करील त्या बाबी अशा :—

(क) कलम ३ च्या पोटकलम (३) अन्वये मंडळाच्या सदस्यांची संख्या ;

(ख) कलम ३ च्या पोटकलम (५) अन्वये मंडळाच्या सदस्यांच्या पदाच्या अटी व सेवेच्या इतर शर्ती ;

(ग) कलम ३ च्या पोटकलम (६) अन्वये अध्यक्षांचे अधिकार आणि कर्तव्ये ;

(घ) कलम ३ च्या पोटकलम (७) अन्वये उपाध्यक्षांचे अधिकार आणि कार्ये ;

(ङ) कलम ५ अन्वये समित्या घटित करणे ;

(च) कलम ७ च्या पोटकलम (१) च्या खंड (आठ) अन्वये निर्यात करण्यासाठी मसाले पदार्थांच्या निर्माणकांसाठी लायसने देण्याच्या अटी आणि शर्ती ;

(छ) कलम १० अन्वये मंडळाकडे विवरणपत्रे भरताना नोंदणीकृत मालकाने विहित रीतीने भरावयाचा नमुना, त्याची पद्धत व वेळ ;

(ज) कलम १२ च्या पोटकलम (१) अन्वये अर्जाचा नमुना आणि फी ;

(झ) कलम १४ च्या पोटकलम (१) अन्वये अपील करण्यासाठी कालमर्यादा ;

(ञ) कलम १४ च्या पोटकलम (३) अन्वये अपिलाचा नमुना व देय असलेली फी ;

(ट) कलम १४ च्या पोटकलम (४) अन्वये अपील निकालात काढण्यासाठीची प्रक्रिया ;

(ठ) विहित नमुन्यात आणि विहित वेळेत मंडळ कलम २२ अन्वये आपला अर्थसंकल्प आणि कलम २३ अन्वये आपला वार्षिक अहवाल तयार करील ;

(ड) मंडळाचे लेखे ज्या पद्धतीने सुस्थितीत ठेवण्यात येतील व लेखापरीक्षा करण्यात येईल ती पद्धत आणि कलम २४ अन्वये केंद्र सरकारकडे लेख्यांची लेखापरीक्षा केलेली प्रत सादर करावयाचा दिनांक ;

(ढ) कलम ३७ खाली दाखल केलेल्या अधिकारांचा वापर करण्याबाबत अटी आणि निर्बंध ;

(ण) अन्य कोणतीही बाब जी, विहित करण्यात येत आहे किंवा विहित करण्यात येईल किंवा नियमाद्वारे ज्या संबंधात तरतूद करण्यात येत आहे किंवा तरतूद करण्यात येईल.

**३९.** (१) मंडळ, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, **राजपत्रात** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाशी सुसंगत असे विनियम तयार करील आणि या अधिनियमाची प्रयोजने चालू ठेवण्यासाठी सर्वसामान्य नियम तयार करील. **विनियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषत: आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, असे विनियम खालीलपैकी एका किंवा सर्व बाबींसाठी तरतूद करतील त्या बाबी अशा :—

(क) कलम ४ च्या पोटकलम (२) अन्वये मंडळाचा सचिव आणि इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ; आणि

(ख) कलम १२ च्या पोटकलम (२) अन्वये ज्या अटी व शर्तींखाली प्रमाणपत्र देण्यात येईल त्या अटी व शर्ती.

**४०.** या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम व विनियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला **संसदेत नियम व विनियम ठेवणे.**

जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात किंवा विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम किंवा विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा विनियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

४१. (१) जर या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकार राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक वाटल्यास या अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश तो काढण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

निरसन व व्यावृत्ती.

४२. (१) वेलची अधिनियम, १९६५ (१९६५ चा ४२) याची कलमे ३ ते ३३ याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

(२) अशा निरसनात काहीही अंतर्भूत असले तरीही, उक्त अधिनियमाच्या तरतुदींअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही ही जेथपर्यंत अशी कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तर, ती या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये केलेली गोष्ट किंवा करण्यात आलेली कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल. जर अशी गोष्ट केली होती किंवा अशी कार्यवाही करण्यात आली होती त्यावेळी उक्त तरतुदी अंमलात होत्या आणि या अधिनियमाअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही जोपर्यंत अधिक्रमण करण्यात येत नाही तोपर्यंत तशाच प्रकारे अंमलात असण्याचे चालू राहील.

## अनुसूची

[कलम २ (ढ) पहा]

कोणत्याही स्वरूपातील—

१. वेलची
२. मिरी
३. मिरची
४. आले
५. हळद
६. धणे (कोथिंबिर)
७. जिरे
८. बडीशेप
९. मेथी
१०. सेलरी
११. बडीशेपेची बी
१२. ओवा
१३. शहाजिरे
१४. बाळंतशेप
१५. दालचिनी
१६. तपालपत्र
१७. लसूण
१८. कढीपत्ता
१९. कोकम
२०. पुदीना
२१. मोहरी
२२. अजमोदा
२३. डाळिंबाची बी
२४. केशर
२५. व्हॅनिला
२६. तेज पान

यांसह करीची पूड, मसाल्याचे तेल, तैल राळे आणि ज्या मिश्रणात मसाल्याचे पदार्थ मुख्य घटक आहेत अशी इतर मिश्रणे.

# THE SPICES BOARD ACT, 1986

## मसाले पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abetment | अपप्रेरणा | [sec 28(2)] |
| abroad | परदेश | [sec 7(2)(x)] |
| accounts | लेखे | [chapter vi title] |
| accuracy | अचूकता | [sec 10(2)] |
| additional fine | अतिरिक्त दंड | [sec 30] |
| admissible | अनुज्ञेय | [sec 6(1)(e)] |
| agent | अभिकर्ता | [sec 2(j)(I)] |
| agriculture | कृषि | [sec 3(3)(c)(ii)] |
| amenities | सुविधा | [sec 7(2) (x)] |
| aniseed | बडीशेपेची बी | [schedule] |
| annual report | वार्षिक अहवाल | [sec 38(2)(k)] |
| annulment | शून्यीकरण | [sec 40] |
| arecanut | सुपारी | [sec 3(3)(g)] |
| assets | मत्ता | [sec 6(1)(a)] |
| assistance | सहाय्य | [sec7(1) (iv)] |
| association | अभिसंघ | [sec 31(2)(a)] |
| auctioneers | लिलाव करणारे | [sec 6(2)(vii )] |
| audit | लेखापरीक्षा | [chapter vi title] |
| before commencement | प्रारंभापूर्वीच | [sec 6(1)(a)] |
| better working conditions | पोषक वातावरण | [sec 7(2)(x)] |
| bishopsweed | शहाजिरे | [schedule] |
| bleachable | रंगहीन | [sec 2(b)] |
| body corporate | निगमनिकाय | [sec 3(2)] |
| broker | दलाल | [sec 7(1)(ii)] |
| budget | अर्थसंकल्प | [sec 38 (2)(k)] |
| caraw | ओवा | [schedule] |
| cardamom | वेलची | [sec 2(b)] |
| cassia | एक प्रकारची दालचिनी | [schedule] |
| cerfiticate | प्रमाणपत्र | [sec 39 (b)] |
| certification | प्रमाणन | [sec 7(1)(vi)] |
| chairman | अध्यक्ष | [sec 3(3)(a)] |
| cinnamom | दालचिनी | [schedule] |
| cocoa | नारळ | [sec 3(3(g)(i)] |
| commerce | वाणिज्य | [sec 3(3)(c)(i)] |
| common seal | सामान्य मुद्रा | [sec 3(2)] |

| | | |
|---|---|---|
| compensation | भरपाई | [sec 6(2)] |
| compilation | संकलन | [sec 7(1)(xi)] |
| compliance | अनुपालन | [sec 19(1)(b)] |
| condition | शर्त | [sec 34] |
| confirm | कायम | sec 14(5)] |
| confiscation | अधिहरण | [sec 29] |
| connivance | मूक संमती | [sec 31(2)] |
| consent | संमती | [sec 31(2)] |
| consumption | खप | [sec 7(2)(vi)] |
| contract | संविदा | [sec 3(2)] |
| control | नियंत्रण | [sec 19(2)(c)] |
| council of state | राज्यसभा | [sec 3(3)(b)] |
| cultivation | लागवड | [preamble] |
| cumin | जिरे | [schedule] |
| custody | ताबा | [sec 27(b)] |
| custom | सीमाशुल्क | sec 32(b)] |
| dealer | विक्रेता | [sec 2(c)] |
| debt | ऋण | [sec 6(1)(b)] |
| default | कसूर | [sec 19(1)(b)] |
| determined | निर्धारित | [sec 4(2)] |
| difficulty | अडचण | [sec 41(1)] |
| diligance | खबरदारी | [sec 31(1)] |
| dill | बाळंतशेप | [schedule] |
| direction | निदेश | [sec 19(1)(b)] |
| directorate | संचालनालय | [sec 3(3)(g)(i)] |
| disqualify | निरर्ह ठरणे | [sec 3(4)] |
| dispute | विवाद | [sec 6(2)] |
| done | अनुलक्षून | [sec 36] |
| due | वाजवी | [sec 31(1)] |
| duly | यथोचितरीत्या | [sec 6(1)(e)] |
| dwelling-house | निवासगृह | [sec 37] |
| efficient | कार्यक्षम | [sec 4(1)] |
| encourage | उत्तेजन | [sec 7(2)(xi)] |
| encouragement | उत्तेजन | [sec 7(1)(iv)] |
| entitle | हक्कदार | [sec 6(2)] |
| entry | प्रवेश | [sec 37] |
| estate | संपदा | [sec 2(f)] |
| existing | विद्यमान | [sec 19(1)(c)] |
| expedient | उचित | [sec 15] |

| | | |
|---|---|---|
| export | निर्यात | [sec 2(g)] |
| Export Promotion Council | निर्यात प्रचालन परिषद | [sec 6(1)(a)] |
| extend | विस्तार | [sec 1(2)] |
| extract | उतारा | [sec 7(2)(ix)] |
| facility | सुविधा | [sec 7(1)(x)] |
| failure | अपयश | [sec 27(a)] |
| fennel | बडीशेप | [schedule] |
| fenugreek | मेथी | [schedule] |
| finance | १. वित्त | [sec 3(3)(c)(iii)] |
| | २. वित्त व्यवस्था | [chapter vi title] |
| financial position | आर्थिक स्थिती | [sec 19(1)(b)] |
| fine | द्रव्यदंड | [sec 26] |
| firm | भागीदारी संस्था | [sec 31(2)(a)] |
| fit | उचित | [sec 28(1)] |
| forfeited | समहृत | [sec 28(1)] |
| form | नमुना | [sec 38(2)(g)] |
| forwarded | उग्रेषित | [sec 22] |
| full account | संपूर्ण तपशील | [sec 23] |
| ginger | आले | [schedule] |
| goods | माल | [sec 32(b)] |
| grade standard | श्रेणीचा दर्जा | [sec 7(2)(v)] |
| gratuity | उपदान | [sec 6(1)(e)] |
| grave emergency | गंभीर निकडीची परिस्थिती | [sec 19(1)(a)] |
| grower | पिकवणारा | [sec 3(3)(d)] |
| House | सभागृह | [sec 41(2)] |
| House of the people | लोकसभा | [sec 3(3)(b)] |
| immediately before | लगतपूर्वी | [sec 6(1)(b)] |
| import | आयात | [sec 2(g)] |
| impose | सोपविणे | [sec 19(1)(a)] |
| imprisonment | कारावास | [sec 27(b)] |
| improvement | सुधारणा | [sec 7(1)(iv)] |
| incentive | प्रोत्साहन | [sec 7(2)(x)] |
| inconsistent | विसंगत | [sec 41(1)] |
| incorporated | संस्थापित | [sec 3(m.n.)] |
| inquiry | चौकशी | [sec 37] |
| inspection | १. तपासणी | [sec 37] |
| | २. निरीक्षण | [sec 16(2)(a)] |
| intention | उद्देश | [sec 37] |
| invalid | विधिअग्राह्य | [sec3(8)] |

| | | |
|---|---|---|
| irregularity | अनियमितता | [sec 3(8)(c)] |
| lessee | पट्टेदार | [sec 2(j)(ii)] |
| liability | दायित्व | [sec 6(1)(b)] |
| licences | अनुज्ञप्ती | [sec 7(1)(viii)] |
| limitation | मर्यादा | [sec 34] |
| major spices | मुख्य मसाले | [sec 3(3)(f)] |
| manner | पद्धत | [sec 38(2)(g)] |
| manufacturer | निर्माणक | [sec 2(h)] |
| marketing | खरेदी-विक्री | [sec 7(2)(viii)] |
| maximum | कमाल | [sec 16(1)(a)] |
| merit of the case | प्रकरणाचे गुणदोष | [sec 3(8)(c)] |
| minimum | किमान | [sec 16(1)(a)] |
| ministry | मंत्रालय | [sec 3(3)(c)] |
| modification | आपरिवर्तता | [sec 40] |
| modify | फेरबदल | sec 14(5)] |
| mortgagee | गहाणदार | [sec 2(j)(ii)] |
| negligence | हयगय | [sec 31(2)] |
| obligation | आबंधने | [sec 6(1)(b)] |
| obstruction | अडथळा | [sec 27(a)] |
| occupier | भोगवटादार | [sec 37] |
| operation | प्रवर्तन | [sec 13(2)] |
| order | आदेश | [sec 41(1)] |
| Parliament | संसद | [sec 3(3)(b)] |
| parsley | अजमोदा | [schedule] |
| penalty | शास्ती | [sec 26(m.n.)] |
| pension | निवृत्तिवेतन | [sec 6(1)(e)] |
| pepper | मिरी | [schedule] |
| plantation | प्रतिरोपण | [sec 3(3)(g)(v)] |
| policy | धोरण | [sec 18(2)] |
| pomegranate seed | डाळिंबाची बी | [schedule] |
| portion | भाग | [sec 7(2)(ix)] |
| prescribed | विहित | [sec 2(k)] |
| previous approval | पूर्वमान्यता | [sec 7(1)(xii)] |
| previous sanction | पूर्वमंजूरी | [sec 33] |
| privious notice | पूर्वसूचना | [sec 37] |
| procedure | प्रक्रिया | [sec 38(2)(k)] |
| processing | संस्करण | [sec 7(1)(iv)] |
| prohibited | निर्बंधित | [sec 32(b)] |

| | | |
|---|---|---|
| promotion | वाढ | [sec 7(1)(ix)] |
| propaganda | प्रचार | [sec 7(2)(vi)] |
| prosecution | खटला | [sec 36] |
| prove | सिद्ध | [sec 31(1)] |
| publication | प्रसिद्धी | [sec 7(1)(xi)] |
| public interest | जनहित | [sec 2(n)] |
| public servant | लोकसेवक | [sec 35] |
| purporting | अभिप्रेत असताना | [sec 35] |
| quality | दर्जा | [sec 7(1)(iv)] |
| quality marking | गुणांकन | [sec 7(1)(vi)] |
| quantity | परिमाण | [sec 16(1)(b)] |
| question of policy | धोरणात्मक प्रश्न | [sec 18(1)] |
| reasonable opportunity | वाजवी संधी | [sec 14(4)] |
| reconstituted | पुनर्घटित | [sec 19(2)(b)] |
| registered | नोंदणीकृत | [sec 38(2)(g)] |
| registered estate | नोंदणीकृत संपदा | [sec 2(1)] |
| regulation | विनियम | [sec 4(2)] |
| remuneration | पारिश्रमिक | [sec 6(1)(e)] |
| repeal | निरसन | [sec 42(m.n.)] |
| replanting | पुनर्लागवड | [sec 7(2)(iii)] |
| representation | प्रतिनिधित्व | [sec 3(3)(c)] |
| restriction | निर्बंध | [sec 17] |
| retail dealer | किरकोळ विक्रेता | [sec 16(1)(a)] |
| return | विवरणपत्र | [sec 26] |
| returns | प्राप्ती | [sec 7(2)(ii)] |
| reverse | परत घेणे | [sec 14(5)] |
| savings | व्यावृत्ती | [sec 42(m.n.)] |
| search | झडती | [sec 16(2)(b)] |
| seizure | अभिग्रहण | [sec 16(2)(b)] |
| shall have effect | प्रभावित होतील | [sec 32(b)] |
| specified | विनिर्दिष्ट | [sec 2(n)] |
| stabilisation | स्थिरीकरण | [sec 7(1)(v)] |
| statistics | आकडेवारी | [sec 7(1)(xi)] |
| successive session | क्रमवर्ती सत्रे | [sec 40] |
| suit | दावा | [sec 3(2)] |
| supersede | निष्प्रभावित | [sec 19(m.n.)] |
| suspended | निलंबित | [sec 13(2)] |
| techniques of grading | प्रतवारीचे तंत्र | [sec 7(1)(iv)] |
| term of office | पदावधी | [sec 3(5)] |

(शा.म.मु.) एच ४२१०—५ (१०३५—३—०७)

| | | |
|---|---|---|
| test | चाचणी | [sec 7(2)(5)] |
| to advise | सल्ला देणे | [sec 7(1)(xiii)] |
| to charge | आकारणे | [sec 16(1)(a)] |
| to collect | गोळा करणे | [sec 7(1)(xi)] |
| to confer | प्रदान करणे | [sec 27(a)] |
| to deteriorate | खालावणे | [sec 19(1)(b)] |
| to discharge | पार पाडणे | [sec 19(1)(a)] |
| to dispose | निकालात काढणे | [sec 14(4)] |
| to enter | प्रवेश करणे | [sec 16(2)(b)] |
| to express | प्रदर्शित करणे | [sec 18(1)] |
| to lie satisfied | खात्री पटणे | [sec 15] |
| to promote | प्रचालन करणे | [sec 7(2)(i)] |
| to strive | आटोकाट प्रयत्न करणे | [sec 7(1)(v)] |
| to supply | पुरवणे | [sec 9(2)] |
| turmeric | हळद | [schedule] |
| validity | विधिग्राह्यता | [sec 40] |
| vessel | जहाज | [sec 16(2)(b)] |
| vice-chairman | उपाध्यक्ष | [sec 38(2)(d)] |
| violation | उल्लंघन | [sec 13(1)(a)] |
| warehouse | वखार | [sec 7(1)(x)] |
| wholesale dealer | घाऊक विक्रेता | [sec 16(1)(a)] |
| without one's knowledge | नकळत | [sec 31(1)] |

# मसाले पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६

# THE SPICES BOARD ACT, 1986

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अग्रेषित | forwarded | [कलम २२] |
| अचूकता | accuracy | [कलम १०(२)] |
| अजमोदा | parsley | [अनुसूची] |
| अडचण | difficulty | [कलम ४१(१)] |
| अडथळा | obstruction | [कलम २७(क)] |
| अतिरिक्त दंड | additional fine | [कलम ३०] |
| अधिहरण | confiscation | [कलम २९] |
| अध्यक्ष | chairman | [कलम ३(३)(क)] |
| अनुज्ञप्ती | licences | [कलम ७(१)(आठ] |
| अनुज्ञेय | admissible | [कलम ६(१)(ङ)] |
| अनुपालन | compliance | [कलम १९(१)(ख)] |
| अनुलक्षून | done | [कलम ३६] |
| अनियमितता | irregularity | [कलम ३(८)(ग)] |
| अपप्रेरणा | abetment | [कलम २८(२)] |
| अपयश | failure | [कलम २७(क)] |
| अभिकर्ता | agent | [कलम २(ञ)(एक)] |
| अभिग्रहण | seizure | [कलम १६(२)(ख)] |
| अभिप्रेत असताना | purporting | [कलम ३५] |
| अभिसंघ | association | [कलम ३१(२)(क)] |
| अर्थसंकल्प | budget | [कलम ३८(२)(ट)] |
| आकडेवारी | statistics | [कलम ७(१)(अकरा)] |
| आकारणे | to charge | [कलम १६(१)(क)] |
| आटोकाट प्रयत्न करणे | to strive | [कलम ७(१)(पाच)] |
| आदेश | order | [कलम ४१(१)] |
| आपरिवर्तन | modification | [कलम ४०] |
| आबंधने | obligation | [कलम ६(१)(ख)] |
| आयात | import | [कलम २(छ)] |
| आर्थिक स्थिती | financial position | [कलम १९(१)(ख)] |
| आले | ginger | [अनुसूची] |
| उचित | expedient | [कलम १५] |
| | fit | [कलम २८(१)] |
| उतारा | extract | [कलम ७(२)(नऊ)] |
| उत्तेजन | 1. encourage | [कलम ७(२)(अकरा)] |
| | 2. encouragement | [कलम ७(१)(चार)] |
| उद्देश | intention | [कलम ३७] |
| उपदान | gratuity | [कलम ६(१)(ङ.)] |

| | | |
|---|---|---|
| उपाध्यक्ष | vice-chairman | [कलम ३८(२)(घ)] |
| उल्लंघन | violation | [कलम १३(१)(क)] |
| ऋण | debt | [कलम ६(१)(ख)] |
| एक प्रकारची दालचिनी | cassia | [अनुसूची] |
| ओवा | caraw | [अनुसूची] |
| कमाल | maximum | [कलम १६(१)(क)] |
| कसूर | default | [कलम १९(१)(ख)] |
| कायम | confirm | [कलम १४(५)] |
| कारावास | imprisonment | [कलम २७(ख)] |
| कार्यक्षम | efficient | [कलम ४(१)] |
| किमान | minimum | [कलम १६(१)(क)] |
| किरकोळ विक्रेता | retail dealer | [कलम १६(१)(क)] |
| कृषि | Agriculture | [कलम ३(३)(ग)(दोन)] |
| क्रमवर्ती सत्रे | successive session | [कलम ४०] |
| खटला | prosecution | [कलम ३६] |
| खप | consumption | [कलम ७(२)(सहा)] |
| खबरदारी | diligance | [कलम ३१(१)] |
| खरेदी-विक्री | marketing | [कलम ७(२)(आठ)] |
| खात्री पटणे | to lie satisfied | [कलम १५] |
| खालावणे | to deteriorate | [कलम १९(१)(ख)] |
| गहाणदार | mortgagee | [कलम २(ञ)(दोन)] |
| गोळा करणे | to collect | [कलम ७(१)(अकरा)] |
| गुणांकन | quality marking | [कलम ७(१)(सहा)] |
| घाऊक विक्रेता | wholesale dealer | [कलम १६(१)(क)] |
| चाचणी | test | [कलम ७(२)(पाच)] |
| चौकशी | inquiry | [कलम ३७] |
| जनहित | public interest | [कलम २(ढ)] |
| जहाज | vessel | [कलम १६(२)(ख)] |
| जिरे | cumin | [अनुसूची] |
| झडती | search | [कलम १६(२)(ख)] |
| डाळिंबाची बी | pomegranate seed | [अनुसूची] |
| तपासणी | inspection | [कलम ३७] |
| ताबा | custody | [कलम २७(ख)] |
| दर्जा | quality | [कलम ७(१)(चार)] |
| दलाल | broker | [कलम ७(१)(दोन)] |
| दायित्व | liability | [कलम ६(१)(ख)] |
| दावा | suit | [कलम ३(२)] |
| दालचिनी | cinnamon | [अनुसूची] |
| द्रव्यदंड | fine | [कलम २६] |

| | | |
|---|---|---|
| धोरण | policy | [कलम १८(२)] |
| धोरणात्मक प्रश्न | question of policy | [कलम १८(१)] |
| नकळत | without one's knowledge | [कलम ३१(१)] |
| नमुना | form | [कलम ३८(२)(छ)] |
| नारळ | cocoa | [कलम ३(३)(छ)(एक)] |
| निकालात काढणे | to dispose | [कलम १४(४)] |
| निगमनिकाय | body corporate | [कलम ३(२)] |
| निदेश | direction | [कलम १९(१)(ख)] |
| नियंत्रण | control | [कलम १९(२)(ग)] |
| निरर्ह ठरणे | disqualify | [कलम ३(४)] |
| निरसन | repeal | [कलम ४२(स.टी.)] |
| निरीक्षण | inspection | [कलम १६(२)(क)] |
| निर्धारित | determined | [कलम ४(२)] |
| निर्बंध | restriction | [कलम १७] |
| निर्बंधित | prohibited | [कलम ३२(ख)] |
| निर्माणक | manufacturer | [कलम २(ज)] |
| निर्यात | export | [कलम २(छ)] |
| निर्यात प्रचालन परिषद | Export Promotion Council | [कलम ६(१)(क)] |
| निलंबित | suspended | [कलम १३(२)] |
| निवासगृह | dwelling-house | [कलम ३७] |
| निवृत्तिवेतन | pension | [कलम ६(१)(ङ)] |
| निष्प्रभावित | supersede | [कलम १९(स.टी.)] |
| नोंदणीकृत | registered | [कलम ३८(२)(छ)] |
| नोंदणीकृत संपदा | registered estate | [कलम २(ठ)] |
| पट्टेदार | lessee | [कलम २(ञ)(दोन)] |
| पदावधी | term of office | [कलम ३(५)] |
| पद्धत | manner | [कलम ३८(२)(छ)] |
| परत घेणे | reverse | [कलम १४(५)] |
| परदेश | abroad | [कलम ७(१)(दहा)] |
| परिमाण | quantity | [कलम १६(१)(ख)] |
| पार पाडणे | to discharge | [कलम १९(१)(क)] |
| पारिश्रमिक | remuneration | [कलम ६(१)(ङ)] |
| पुनर्घटित | reconstituted | [कलम १९(२)(ख)] |
| पुनर्लागवड | replanting | [कलम ७(२)(तीन)] |
| पुरवणे | to supply | [कलम ९(२)] |
| पूर्वमान्यता | previous approval | [कलम ७(१)(बारा)] |
| पूर्वमंजुरी | previous sanction | [कलम ३३] |
| पूर्वसूचना | previous notice | [कलम ३७] |
| पिकवणारा | grower | [कलम ३(३)(घ)] |

| | | |
|---|---|---|
| पोषक वातावरण | better working conditions | [कलम ७(२)(दहा)] |
| प्रकरणाचे गुणदोष | merit of the case | [कलम ३(८)(ग)] |
| प्रक्रिया | procedure | [कलम ३८(२)(ट)] |
| प्रचार | propaganda | [कलम ७(२)(सहा)] |
| प्रचालन करणे | to promote | [कलम ७(२)(एक)] |
| प्रतवारीचे तंत्र | techniques of grading | [कलम ७(१)(चार)] |
| प्रतिनिधित्व | representation | [कलम ३(३)(ग)] |
| प्रतिरोपण | plantation | [कलम ३(३)(छ)(पाच)] |
| प्रदर्शित करणे | to express | [कलम १८(१)] |
| प्रदान करणे | to confer | [कलम २७(क)] |
| प्रभावित होतील | shall have effect | [कलम ३२(ख)] |
| प्रमाणन | certification | [कलम ७(१)(सहा)] |
| प्रमाणपत्र | certificate | [कलम ३९(ख)] |
| प्रवर्तन | operation | [कलम १३(२)] |
| प्रवेश | entry | [कलम ३७] |
| प्रवेश करणे | to enter | [कलम १६(२)(ख)] |
| प्रसिद्ध | publication | [कलम ७(१)(अकरा)] |
| प्राप्ती | returns | [कलम ७(२)(दोन)] |
| प्रारंभापूर्वीच | before commencement | [कलम ६(१)(क)] |
| प्रोत्साहन | incentive | [कलम ७(२)(दहा)] |
| फेरबदल | modify | [कलम १४(५)] |
| बडीशेप | fennel | [अनुसूची] |
| बडीशेपची बी | aniseed | [अनुसूची] |
| बाळंतशेप | dill | [अनुसूची] |
| भरपाई | compensation | [कलम ६(२)] |
| भाग | portion | [कलम ७(२)(नऊ)] |
| भागीदारी संस्था | firm | [कलम ३१(२)(क)] |
| भोगवटादार | occupier | [कलम ३७] |
| मत्ता | assets | [कलम ६(१)(क)] |
| मर्यादा | limitation | [कलम ३४] |
| माल | goods | [कलम ३२(ख)] |
| मिरी | pepper | [अनुसूची] |
| मुख्य मसाले | major spices | [कलम ३(३)(च)] |
| मूक संमती | connivance | [कलम ३१(२)] |
| मेथी | fenugreck | [अनुसूची] |
| मंत्रालय | ministry | [कलम ३(३)(ग)] |
| यथोचितरीत्या | duly | [कलम ६(१)(ड)] |
| राज्यसभा | council of states | [कलम ३(३)(ख)] |
| रंगहीन | bleachable | [कलम २(ख)] |
| लगतपूर्वी | immediately before | [कलम ६(१)(ख)] |
| लागवड | cultivation | [उद्देशिका] |

| | | |
|---|---|---|
| लोकसभा | House of the people | [कलम ३(३)(ख)] |
| लोकसेवक | public servant | [कलम ३५] |
| लेखापरीक्षा | audit | [प्रकरण सहा शीर्षक] |
| लेखे | accounts | [प्रकरण सहा शीर्षक] |
| लिलाव करणारे | auctioneers | [कलम ७(२)(सात)] |
| वखार | warehouse | [कलम ७(१)(दहा)] |
| वाजवी | due | [कलम ३१(१)] |
| वाजवी संधी | reasonable opportunity | [कलम १४(४)] |
| वाढ | promotion | [कलम ७(१)(नऊ)] |
| वाणिज्य | commerce | [कलम ३(३)(ग)(एक)] |
| वित्तव्यवस्था | finance | [प्रकरण सहा शीर्षक] |
| विद्यमान | existing | [कलम १९(१)(ग)] |
| वार्षिक अहवाल | annual report | [कलम ३८(२)(ट)] |
| विक्रेता | dealer | [कलम २(ङ)] |
| वित्त | finance | [कलम ३(३)(ग)(तीन)] |
| विधिअग्राह्य | invalid | [कलम ३(८)] |
| विधिग्राह्यता | validity | [कलम ४०] |
| विनिमय | regulation | [कलम ४(२)] |
| विनिर्दिष्ट | specified | [कलम २(ढ)] |
| विवरणपत्र | return | [कलम २६] |
| विवाद | dispute | [कलम ६(२)] |
| विसंगत | inconsistent | [कलम ४१(१)] |
| विस्तार | extend | [कलम १(२)] |
| विहित | prescribed | [कलम १(ट)] |
| वेलची | cardamom | [कलम २(ख)] |
| व्यावृत्ती | savings | [कलम ४२(स.टी.)] |
| शर्त | condition | [कलम ३४] |
| शहाजिरे | bishopsweed | [अनुसूची] |
| शास्ती | penalty | [कलम २६(स.टी.)] |
| शून्यीकरण | annulment | [कलम ४०] |
| श्रेणीचा दर्जा | grade standard | [कलम ७(२)(पाच)] |
| सभागृह | House | [कलम ४१(२)] |
| समपहृत | forfeited | [कलम २८(१)] |
| सल्ला देणे | to advise | [कलम ७(१)(तेरा)] |
| सहाय्य | assistance | [कलम ७(१)(चार)] |
| समान्य मुद्रा | common seal | [कलम ३(२)] |
| सोपविणे | impose | [कलम १९(१)(क)] |
| सुधारणा | improvement | [कलम ७(१)(चार)] |
| सुपारी | arecanut | [कलम ३(३)(छ)(एक)] |
| सुविधा | 1. facility | [कलम ७(१)(दहा)] |
| | 2. amenities | [कलम ७(२)(दहा)] |
| सिद्ध | prove | [कलम ३१(१)] |

| | | |
|---|---|---|
| सीमाशुल्क | custom | [कलम ३२(ख)] |
| संचालनालय | directorate | [कलम ३(३)(छ)(एक)] |
| संपदा | estate | [कलम २(च)] |
| संकलन | compilation | [कलम ७(१)(अकरा)] |
| संपूर्ण तपशील | full account | [कलम २३] |
| संमती | consent | [कलम ३१(२)] |
| संविदा | contract | [कलम ३(२)] |
| संसद | Parliament | [कलम ३(३)(ख)] |
| संस्करण | processing | [कलम ७(१)(चार)] |
| संस्थापित | incorporated | [कलम ३(स.टी.)] |
| स्थिरीकरण | stabilisation | [कलम ७(१)(पाच)] |
| हक्कदार | entitle | [कलम ६(२)] |
| हयगय | negligence | [कलम ३१(२)] |
| हळद | termeric | [अनुसूची] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई